# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### ठाणे जिल्ह्यात शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील हल्ल्यांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(१) ३२८ (२२-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ७७ शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर हल्ला करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अशा प्रकारच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने सदरच्या घटनांना आळा घालण्यासाठी तसेच कायद्यामध्ये सुधारणा करुन कठोर शिक्षेची तरतूद करावी याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०८-१०-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्ह्यातील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर हल्ल्यांबाबत ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सन २०२५ मध्ये २८ गुन्हे, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत ७ गुन्हे, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत सन २०२४ मध्ये २२ गुन्हे व सन २०२५ मध्ये ३ गुन्हे तसेच पोलीस अधिक्षक ठाणे ग्रामीण अंतर्गत सन २०२५ मध्ये ४ असे एकूण ६४ गुन्हे दाखल आहेत.

(२) शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर हल्ल्याबाबत भारतीय न्याय संहिता, २०२३ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

कलम १२१ (१) - सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कर्तव्यापासून परावृत्त करण्यासाठी स्वेच्छेने दुखापत केल्यास ५ वर्षांपर्यंत कारावसाची शिक्षा किंवा दंड किंवा दोन्ही होऊ शकते.

कलम १२१ (२) - सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कर्तव्यापासून परावृत्त करण्यासाठी स्वेच्छेने गंभीर दुखापत केल्यास १ ते १० वर्षांपर्यंत कारावसाची शिक्षा आणि दंड होऊ शकते.

कलम १३२ - सरकारी कर्मचाऱ्यांना कर्तव्यापासून परावृत्त करण्यासाठी हल्ला केल्यास किंवा फौजदारी पात्र बळाचा वापर केल्यास २ वर्षांपर्यंत कारावसाची शिक्षा किंवा दंड किंवा दोन्ही होऊ शकते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पोलीस उपनिरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२) ९५२ (२२-०४-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलीस उपनिरीक्षकांच्या ९८४५ पदापैकी ६८४५ पदे भरण्यात आली असून उर्वरित २९५९ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे केवळ २१६ पोलीस उपनिरीक्षकांच्या जागा भरण्याचे मागणीपत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पुर्वपरीक्षा दिनांक १ डिसेंबर, २०२४ रोजी पार पडली असून नवीन पॅटर्न सुरु होण्यापूर्वी सदर रिक्त जागा भरल्या जाव्यात, त्यामुळे नव्या पॅटर्ननूसार परीक्षा होण्यापुर्वी जुन्या पॅटर्ननुसार अभ्यास करुन परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना न्याय मिळेल, अशी विद्यार्थ्यांमधून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परिक्षार्थींच्या मागणीनुसार उक्त रिक्त जागा भरण्यासाठी राज्य लोकसेवा आयोगाचा नवा पॅटर्न लागू होण्यापुर्वी भरती प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२५) :** (१) पोलीस उपनिरीक्षक (निःशस्त्र) संवर्गात माहे जानेवारी २०२५ मध्ये एकूण ९८६४ पदे मंजूर होती त्यापैकी ८०४३ पदे भरलेली व १९२१ पदे रिक्त होती.

(२) व (३) पोलीस उपनिरीक्षक (निःशस्त्र) सरळसेवा परीक्षा-२०२४ करीता मागणीपत्र पाठविताना पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या सरळसेवेच्या ५० टक्के कोट्यामध्ये एकूण ४९३० पदे मंजूर त्यापैकी ४४२८ पदे भरलेली व ५०२ पदे रिक्त होती. तसेच माहे ऑगस्ट, २०२५ अखेर १०६७ इतकी संभाव्य रिक्त अशी एकूण १५६९ रिक्त पदे होती. सन २०२१,२०२२ व २०२३ च्या परीक्षेमधील भरती प्रक्रिया सुरु असलेली १३५३ पदे वजा जाता एकूण २१६ पदे भरती प्रक्रियेकरीता उपलब्ध होती. त्यामुळे पोलीस उपनिरीक्षक (निःशस्त्र) सरळसेवा परीक्षा-२०२४ करीता २१६ पदांचे मागणीपत्र दिनांक ०४/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले.

(४) पोलीस उपनिरीक्षक (निःशस्त्र) सरळसेवा परीक्षा-२०२५ करीता ३९२ पदांचे मागणी पत्र दिनांक ११/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंहगड येथे परदेशी पर्यटकांसोबत गैरवर्तन झाल्याबाबत

**(३) २३५२ (१८-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सिंहगड किल्ला सर करताना न्यूझीलंडमधील पर्यटक ल्यूक याला राज्यातील काही तरुणांनी मराठीत शिवीगाळ करण्यास प्रवृत्त केल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परदेशी नागरिकांविषयी अशा प्रकारची द्वेषयुक्त व अवमानकारक वर्तनामुळे भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा मलीन होण्याची शक्यता असून समाजमाध्यमांवरील अशा प्रकारच्या गैरवर्तनामुळे समाजात असहिष्णुतेचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०८-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे.

पुण्यातील सिंहगड किल्ला सर करताना न्युझीलंडमधील पर्यटक युट्यूबर ल्युकेथ याला राज्यातील काही तरुणांनी मराठीत शिवीगाळ करण्यास प्रवृत्त केल्याची बाब दिनांक १२ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आली आहे.
(२) सदर घटनेच्या अनुषंगाने, हवेली पोलीस स्टेशन येथे एन.सी.आर. क्रं.१२१/२०२५ भारतीय न्याय संहीता २०१३ चे कलम ४९, ३५२, ३०२ अन्वये दिनांक १२/०४/२०२५ रोजी अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरची तक्रार ही एन.सी.आर. असल्याने सदर घटनेचा तपास करण्याची न्यायालयाकडून परवानगी मिळणेबाबत दिनांक १७/०४/२०२५ रोजी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
(३) गडकिल्ल्यांवर येणाऱ्या परदेशी नागरिकांसोबत सर्वांनी सदाचाराने वागावे व त्यांच्याशी कोणतेही गैरवर्तन केल्यास त्यांच्यावर योग्य ती कठोर कारवाई करण्यात येईल असे प्रसारमाध्यमांद्वारे पोलीसांकडून आवाहन करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक येथील त्र्यंबकेश्वर कुंभमेळा सन २०२७ करीता नाशिक अग्निशमन दलाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(४) २४५० (१८-०७-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील त्र्यंबकेश्वर कुंभमेळा सन २०२७ करीता एनडीआरएफ मधून नाशिक अग्निशमन दलाचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, नाशिक अग्निशमन दलाचे एनडीआरएफमधून श्रेणीवर्धन हे नैसर्गिक आपत्ती आणि इतर आपत्कालीन घटनांना अधिक प्रभावीपणे आणि सुरक्षितपणे सामोरे जाण्यासाठी आवश्यक असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

अग्निशमन सेवेचे विस्तारीकरण व आधुनिकीकरण करणेच्या दृष्टीकोनातुन संचालक अग्निशमन सेवा महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय मुंबई यांना दिनांक ०४/०२/२०२५ रोजी व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक यांना दिनांक ०४/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये नाशिक महानगरपालिका मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत

**(५) २४७६ (१७-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने राज्यातील राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्यासाठी समिती नेमली असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीने सदरील खटले मागे घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०२५) :** (१) शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक २०/०९/२०२२ नुसार राजकीय व सामाजिक आंदोलनातील ज्या गुन्ह्यांमध्ये दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले व शासन निर्णयामध्ये नमूद निकषांची पूर्तता होत आहे असे खटले मागे घेण्याबाबत कायदेशीर तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी क्षेत्रिय समित्या गठित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक १२/०९/२०२५ अन्वये दिनांक ३०/०९/२०२५ पर्यंत दोषारोपपत्रे दाखल होतील, असे खटले उक्त दिनांक २०/०९/२०२२ च्या शासन निर्णयात नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून मागे घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (दिवाणी)(Civil) क्र.६९९/२०१६ (अश्विनीकुमार उपाध्याय वि. युनियन ऑफ इंडिया व इतर) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार ज्या खटल्यांमध्ये विद्यमान व माजी खासदार व आमदार यांचा समावेश आहे, असे खटले मा.उच्च न्यायालयाच्या संमतीशिवाय मागे घेता येणार नाहीत.

तसेच राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्यासाठी भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम ३६० मधील तरतुदीस अनुसरुन (फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम ३२१) संबंधित सरकारी वकील किंवा सहाय्यक सरकारी वकील यांना सूचना/शिफारस करण्याकरीता ॲड. आशिष शेलार, मा.मंत्री, माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक २७/०३/२०२५ नुसार मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे.
(२) उक्त नमूद दिनांक २०/०९/२०२२ व दिनांक १२/०९/२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार निकषांची पूर्तता होत असलेले खटले मागे घेण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रिय समित्यांमार्फत केली जात आहे. तसेच दिनांक २०/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील निकष, क्षेत्रिय समिती व संबंधित सरकारी

अभियोक्ता यांनी केलेल्या शिफारशीस अनुसरुन, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ज्या खटल्यांमध्ये विद्यमान व माजी खासदार व आमदार यांचा समावेश आहे, असे खटले शासन मान्यतेने मागे घेण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सरकारी अभियोक्ता, मा.उच्च न्यायालय यांना प्रकरण परत्वे कळविण्याची कार्यवाही शासनामार्फत केली जात आहे.

तसेच, शासन निर्णय, दिनांक २७/०३/२०२५ अन्वये गठीत मंत्रिमंडळ उपसमितीसमोर मा.लोकप्रतिनिधींकडून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने खटले मागे घेण्याचे प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई सेंट्रल टर्मिनसला नाना शंकरशेठ यांचे नाव देणे बाबत

**(६) २५८३ (१७-०७-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय रेल्वेचे जनक, मुंबईचे आद्य शिल्पकार नामदार जगन्नाथ नाना शंकरशेठ यांचे नाव मुंबई सेंट्रल टर्मिनसला दयावे अशी मुंबईतील स्थानिक नागरिकांनी मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या पूर्ततेसाठी मुंबईत आंदोलने होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून सदर मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (०९-१०-२०२५) :** (१), (२), (३) व (४) "मुंबई सेंट्रल टर्मिनस" या रेल्वे स्थानकाचा नामविस्तार "नाना शंकर शेठ मुंबई सेंट्रल टर्मिनस" असे करण्याबाबतचा निर्णय दिनांक १२/०३/२०२० रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

सदर निर्णय दिनांक २७/०७/२०२ ० रोजीच्या शासन पत्राने केंद्रीय गृह मंत्रालयाला कळविण्यात आला आहे. सदर विषयाबाबत राज्य शासनाने वेळोवेळी केंद्रीय गृह मंत्रालयाकडे पाठपुरावा केलेला आहे. सदर प्रस्तावास केंद्रीय गृह मंत्रालयाची अंतिम मान्यता प्रतीक्षाधीन आहे.

---

## नागपूरमध्ये होणाऱ्या घरफोड्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(७) २६२३ (१८-०७-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरामध्ये माहे जानेवारी ते माहे एप्रिल, २०२५ या कालावधीत ३२६ घरफोडयांच्या गुन्हयांची नोंद करण्यात आली असून यापैकी किती गुन्हयांचा शोध व रोख रक्कम वसूल करण्यासंदर्भात पोलीसांना

यश आले आहे,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहरातील घरफोड्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०२५) :** (१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाअंतर्गत माहे जानेवारी ते माहे एप्रिल, २०२५ मध्ये घरफोडीच्या गुन्ह्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.
दाखल गुन्हे (जानेवारी ते एप्रिल २०२५) ३२६
उघड गुन्हे ९७
अटक आरोपी १२१
गेलेला माल ३,५१,०८,१४६
मिळालेला माल ७६,२८,५८५
प्रतीबंधात्मक कार्यवाही ७०
(२) नागपूर शहरातील घरफोडी/चोरीचे गुन्ह्यांबाबत खालील प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात येत आहेत.:-
१. गुन्हेगारांचा शोध घेऊन अटक, मुद्देमाल जप्ती व सबळ पुरावे गोळा करून दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले जात आहे.
२. शहराची बिट सिस्टिमनुसार विभागणी करून प्रत्येक बिटमध्ये अधिकारी, अंमलदार व बिट मार्शल नेमले आहेत.
३. रात्रगस्त/नाईट पेट्रोलींग सकाळी ६ पर्यंत वाढवून अधिकारी व अंमलदारांची नियुक्ती केली आहे.
४. आरोपी चेकिंगसाठी बिट अधिकारी, अंमलदार व मार्शल सतत गस्त घालतात व संशयितांची तपासणी करतात.
५. बिट पेट्रोलिंग प्रभावी करण्यासाठी QR कोड पध्दती बसविण्यात आली आहे.
६. घरफोडी/चोरीसंदर्भातील हॉट स्पॉट्सचा अभ्यास करून त्या ठिकाणी गस्त वाढविण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य मार्ग पहिवहन महामंडळाकरिता पूर्णवेळ अध्यक्षाची नियुक्ती करणेबाबत

**(८) २६५३ (१७-०७-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये पूर्णवेळ अध्यक्ष नसल्याने अनेक महत्वाचे निर्णय अध्यक्षाच्या मंजूरी अभावी प्रलंबित आहेत तसेच दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असून राज्य मार्ग परिवहन

महामंडळ आर्थिक संकटात सापडले असून ७००० कोटी रुपयांची देणी प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अध्यक्ष नसल्याने मंजुरीअभावी २५ पेक्षा जास्त फाईल्स निर्णयाविना प्रलंबित आहेत व अद्याप अध्यक्ष निवड न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, एसटी महामंडळाच्या अनेक फाईल्स निकाली काढण्याच्या दृष्टीने शासनाने राज्य मार्ग परिवहन महामंडळावर अध्यक्षाची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रताप सरनाईक (१६-१०-२०२५) :** (१) नाही.
(२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य शासनाच्या दिनांक ०९ एप्रिल, २०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मा.मंत्री (परिवहन) यांची म. रा. म. प. महामंडळाच्या अध्यक्ष पदी नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार मा.मंत्री (परिवहन) यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अध्यक्ष पदाचा कार्यभार स्विकारला आहे.

---

## आयपीएलच्या थेट प्रक्षेपणाचे अधिकृत हक्क व्हायकॉम -१८ मीडिया प्रायव्हेट लि. या कंपनीकडे असतानाही फेअर प्ले या संकेतस्थळावर अनधिकृतपणे मॅचेस दाखविल्याबाबत

**(९) २७५९ (१७-०७-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आयपीएलच्या थेट प्रक्षेपणाचे अधिकृत हक्क व्हायकॉन-१८ मीडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडे असूनही मागील दोन वर्षांपूर्वी अवैधरित्या थेट प्रक्षेपण फेअर प्ले या संकेतस्थळाने केले असल्याची तक्रार मुंबई पोलिसांच्या सायबर कक्षाकडे एफ आय आर नोंदविण्यात आला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, फेयर प्ले या संकेतस्थळाने आपल्या जाहिरातीसाठी चित्रपटसृष्टीतील क्रीडा व अन्य क्षेत्रातील सेलिब्रिटींचा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून वापर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्तरोक्त प्रकरणी फेअर प्ले संकेतस्थळाने अवैधरित्या थेट प्रक्षेपण केल्याप्रकरणी व त्यांच्या मालकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०२५) :** (१) व (२), हे खरे आहे.
(३) माहे ऑक्टोबर २०२१ ते दिनांक २०/०४/२०२३ दरम्यान कॉम्प्युटर सॉफ्टवेअरचा वापर करुन PIKASHOW APP, FOXI APP, VEDU APP, SMART PLAYER LITE APP, FILM PLUS APP, TEA TV APP, WOW TV APP, FAIR PLAY या ॲप्लीकेशनचे मालक, वितरक व जाहीरातदार यांनी कट रचून ॲप्लीकेशन व वेबसाईटच्या माध्यमातून Viacom१८ चे Colors प्रादेशीक चॅनल्स व MTV, Nick इत्यादी चॅनेल्सवरील कंटेन्ट तसेच VOOT SELECT वरील वेबसिरीज, चित्रपट, सिरीयल्स, टाटा आय.पी.एल. २०२३ क्रिकेट मॅच इत्यादींचे थेट प्रक्षेपणाचे अधिकार नसताना बेकायदेशीरपणे पुर्नप्रक्षेपण करुन Viacom१८ कंपनीकडील प्रक्षेपणाच्या अधिकाराचे उल्लंघन केले व कंपनीचे आर्थिक नुकसान करण्याच्या हेतुने अंदाजे १०० कोटी रूपयांपेक्षा जास्त आर्थिक फसवणूक केली.

तसेच शासनाची अप्रत्यक्षरित्या फसवणूक केल्या प्रकरणी नोडल सायबर पोलीस ठाणे, महाराष्ट्र सायबर, मुंबई या ठिकाणी गु.र.क्र. ०४/२०२३, भा.द.वि. चे कलम ४२०, १२०(ब), ४६८, ४६९, ४७१, माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ४३, ६६, ६६(ब) व कॉपीराईट ॲक्ट कलम ६३ अन्वये गुन्हा दाखल केला होता.सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करून दिनांक २९/०५/२०२४ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.

त्यानंतर आरोपीने मा.उच्च न्यायालयात सदर गुन्हा Quashing करीता अर्ज केला होता.सदर अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदार नामे व्हायकॉम १८ मिडीया प्रायव्हेट लि. कंपनी व गुन्हयातील आरोपी यांच्या मध्ये परस्पर Settlement Agreement झाले असल्याने मा.उच्च न्यायालयाने दिनांक १२/०२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये सदर नमुद गुन्हा Quash केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना गृह बांधणी कर्ज योजनेचा लाभ देणेबाबत

**(१०) २८७४ (१८-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ६००० पोलीस कर्मचाऱ्यांनी स्वतः चे घर बांधणीसाठी शासनाच्या (डीजी लोन) पोलीस गृह बांधणी अग्रिम योजनेंतर्गत गृह कर्जासाठी अर्ज करूनही माहे ऑगस्ट, २०२३ पासून एकही अर्ज मंजूर करण्यात आलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस कर्मचाऱ्यांना तात्काळ गृह कर्ज उपलब्ध करून देणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०२५) :** (१) होय.

(२) पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांनी शिफारस केल्यानुसार, राज्यातील पोलीस दलातील अधिकारी-अंमलदार यांच्यासाठी घरबांधणी अग्रिमाकरीता दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत प्राप्त ५४५९ अर्जदारांकरीता आवश्यक असणारी रुपये १७६८.०८ कोटी इतकी रक्कम विविध बँक / वित्तीय संस्था यांच्याकडून दरपत्रके मागवून न्यूनतम व्याजदराने नवीन कर्ज उभारणी करण्यासाठी वित्त विभागाच्या सहमतीने काही अटींच्या अधीन राहून दिनांक ११/९/२०२५ शासन पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातेगांव – विहीगांव – खल्लार प्रमुख जिल्हा मार्ग १५ चे काम पूर्ण करण्याबाबत

**(११) २९५४ (१७-०७-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातेगांव – विहीगांव – खल्लार प्रमुख जिल्हा मार्ग १५ चे बांधकाम मंजूर करण्यात आले असून सदर बांधकामाकरीता शासनाने उपलब्ध करून दिलेली तरतूद कमी असल्यामुळे सदरचे काम थांबविण्यात

आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गावरील विहीगांव येथील शहानुर नदीवरील पुलाकरीता तरतूद मंजूर न केल्यामुळे पुलाच्या कामास प्रारंभ होऊ शकला नाही तसेच पुलाच्या बांधकामासह संपूर्ण मार्ग पूर्ण करण्यास लागणारी तरतूद यावर्षी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, सातेगांव ते खल्लार मार्गावरील जवळपास ५० गांवांना प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणे जोडणारा हा रस्ता सन २०२५-२६ मध्ये पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (११-०९-२०२५) :** (१) सातेगाव-विहीगाव-खल्लार रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१५ (जुना), नविन राज्यमार्ग क्र.५०० कि.मी. ८/२०० ते १३/०० या लांबीमध्ये रस्ता सुधारणेचे काम मंजूर असून सद्य:स्थितीत काम MPM पर्यंत पूर्ण झालेले आहे. पावसाळा संपल्यावर डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(२) सदर मार्गावरील विहीगाव गावाजवळ (सा.क्र. कि.मी.७/५००) वर मोठ्या पुलाचे काम निधी, निकष व प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) सदरचे काम करारनाम्याच्या तरतुदीप्रमाणे माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जलदगती न्यायालयांत खटले प्रलंबित असल्याबाबत

**(१२) ३११८ (१७-०७-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक १७०६६ ला दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय विधि आणि न्याय मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार गंभीर गुन्हे, महिला व बालकांवरील अत्याचार आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या नागरी प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी राज्यात स्थापन करण्यात आलेल्या जलदगती न्यायालयांत १.७५ लाख खटले सद्य:स्थितीत प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील जलदगती न्यायालयांतील प्रलंबित खटल्यांचा तातडीने निपटारा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०२५) :** (१) "National Mission for Safety of Women" अंतर्गत राज्यात स्थापन करण्यात आलेल्या जलदगती न्यायालयांमध्ये दिनांक ३/०६/२०२५ अखेर १,५४,१८६ प्रकरणे प्रलंबित आहेत.
(२) जलदगती न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यांचा निपटारा करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने खालील उपाययोजना केल्या आहेत:-क) मा.उच्च न्यायालयाच्या राज्य न्यायालय व्यवस्थापन प्रणाली (SCMS) समिती नोव्हेंबर २०१७ पासून दरवर्षी जिल्हा न्यायपालिकेच्या न्यायालयांसमोर प्रलंबित

असलेल्या जुन्या प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी कृती आराखडा तयार करत आहे. मा.समितीने २०१८ ते २०२४ या वर्षांसाठी कृती आराखडा तयार केला असून, कृती आराखड्यानुसार विहित वेळेत ५-१० वर्षे जुने, १०-२० वर्षे जुने, २०-४० वर्षे जुने आणि ४० वर्षांवरील जुने खटल्यांचा जलद निपटारा करण्याबाबत जिल्हा न्यायपालिकेच्या न्यायालयांना कळविण्यात आले आहे.

ख) प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी मा.समितीने तयार केलेला विशेष मोहीम कार्यक्रम जिल्हा न्यायपालिकेच्या न्यायालयांकडून राबविण्यात येत आहे.

ग) मा.सर्वोच्च न्यायालयाने सुचविल्यानुसार, मा.उच्च न्यायालयाने जिल्हा न्यायालयांमधील प्रलंबित प्रकरणे कमी करण्यासाठी एप्रिल २०२४ ते जून २०२५ पर्यंतचा अतिरिक्त कृती आराखडा महाराष्ट्र, गोवा आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सर्व जिल्हा न्यायालयांना पाठविला आहे. ज्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील माजी संवर्गीय न्यायालये देखील समाविष्ट आहेत. या कृती आराखड्याचे उद्दिष्ट जुने खटले जलदगतीने निकाली काढणे आहे.

मा.राज्य न्यायालय व्यवस्थापन समिती प्रलंबित प्रकरणाच्या प्रगतीवर लक्ष ठेवते.

घ) तसेच. मा.उच्च न्यायालयाच्या राज्य न्यायालय व्यवस्थापन प्रणाली समितीने, राज्यातील सर्व मामलतदार न्यायालयांना भाडेपट्टा संदर्भ कालबध्द पध्दतीने निकाली काढण्याचे निर्देश देण्याबाबत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांना कळविले आहे. यामुळे भाडेपट्टा संदर्भ जलदगतीने निकाली काढले जातील आणि शेवटी, दिवाणी दावे पुढे चालवले जातील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देऊरवाडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील रेती चोरी प्रकरणाबाबत

**(१३) ३३१२ (१८-०७-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (देऊरवाडा) येथील घाटावर रेती चोरी प्रकरणामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीची बदनामी होईल अशा प्रकारचा मजकूर समाजमाध्यमावर प्रसारित केल्यामुळे होजेफा बोहरा आर्वी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करून अटक करण्याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ६ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

आर्वी (देऊरवाडा) येथील घाटावर रेती चोरी प्रकरणामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीची बदनामी होईल अशा प्रकारचा मजकूर समाजमाध्यमावर प्रसारित केल्यामुळे होजेफा बोहरा, आर्वी याच्याविरुध्द गुन्हा दाखल करून अटक करण्याबाबतचा अर्ज श्री.दादाराव केचे, मा.वि.प.स. यांनी दिनांक ०६/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन, आर्वी येथे दिला आहे.

(२) श्री.दादाराव केचे, मा.वि.प.स. यांनी दिनांक ०६/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन आर्वी, जि.वर्धा येथे दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने होझेफा बोहरा, रा. आर्वी याच्या विरुध्द भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५६(२) अन्वये दिनांक ०६/०५/२०२५ रोजी अदखलपात्र गुन्हा ४८०/२०२५ दाखल

करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास करणे आवश्यक असल्याने तपास करण्यास परवानगी मिळणेबाबत भा. ना. सु. सं. २०२३ कलम १७४ अन्वये मा.न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी न्यायालय, आर्वी, जि.वर्धा यांना विनंती करण्यात आली आहे.

तसेच, आरोपी होझेफा बोहरा याच्या विरुध्द भा. ना. सु. सं. २०२३, कलम १२६ व १३५ (३) अन्वये दिनांक ०७/०५/२०२५ रोजी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली असून त्याच्याकडुन शांतता राखण्यासाठी दिनांक २९/०५/२०२५ ते २८/०५/२०२६ या कालावधीसाठी बंधपत्र घेण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबत मा.विधानपरिषद सदस्य यांना दिनांक २५/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाने पोलीस भरती करण्याबाबत

**(१४) ३५३३ (१८-०७-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने पोलीस भरती करण्याबाबत आश्वासन देवूनही अद्याप भरती प्रक्रियेला सुरुवात केली नसल्यामुळे तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य निर्माण झाले असल्याची बाब माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,मागील दीड वर्षांपासून तरुण सदर भरतीची तयारी करीत असून भरतीबाबत आश्वासने देऊनही त्याची अंमलबजावणी न होण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, पोलीस भरतीची अंमलबजावणी तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली करण्यात वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०८-१०-२०२५) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई संवर्गातील सन २०२४ मधील रिक्त असलेली व सन २०२५ मध्ये रिक्त होणारी अशी एकूण १५,६३१ रिक्त पदे भरण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेस दिनांक २०/०८/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) सनगाव येथे एका शेतामध्ये महिला वकिलाला अमानुष मारहाण केल्याबाबत

**(१५) ३६१७ (१८-०७-२०२५) ॲड.अनिल परब, श्री.सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) सनगाव येथे एका शेतामध्ये ॲड.ज्ञानेश्वरी अंजान या वकिल महिलेस गावच्या सरपंचासह सुमारे १० व्यक्तींनी अमानुष बेदम मारहाण केली असल्याचे दि १७ एप्रिल,२०२५ रोजी वा

त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मारहाणी केलेल्या आरोपींविरुध्द पोलीस स्थानकामध्ये तक्रार दाखल केली आहे ,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने मारहाण केलेल्या संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

दिनांक १४/०४/२०२५ रोजी ॲड. ज्ञानेश्वरी अंजान या वकील महिलेस मारहाण केल्याप्रकरणी त्यांच्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे, युसुफवडगाव, जि.बीड येथे गु.र.न. ११३/२०२५ भा.न्या.सं. २०२३ कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ७४, १८९(२), १९१ (२), १९०, ३५२, ३५१(२) अन्वये एकूण १० आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर प्रकरणी उपरोक्त प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदरील गुन्हाच्या तपास अद्याप सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पोलीस खात्यात माहिती आधिकाराचे प्रलंबित असल्याबाबत

**(१६) ३८०७ (१८-०७-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती, बीड, भंडारा, धुळे, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जळगाव, कोल्हापूर, नागपूर ग्रामीण, नांदेड, नंदुरबार, नाशिक ग्रामीण, धाराशीव, पालघर, सांगली, सातारा, सोलापूर ग्रामीण, वर्धा,वाशीम ग्रामीण, बुलढाणा या पोलीस अधीक्षक कार्यालयात माहिती आधिकाराचे १०० अर्ज प्रलंबित असल्याचे दिनांक २७ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासकीय कामाला गती देण्यासाठी मा.मुख्यमंत्री तथा मा.गृह मंत्री यांनी मंत्रालयातील विविध खात्यांना १०० दिवसांचा कार्यक्रम दिला असतानाही जवळपास २१ जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत एकाही अर्जाचे अद्याप निराकारण करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अर्ज प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत तसेच अर्ज निकाली न काढण्याऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) सर्व पोलीस अधीक्षक कार्यालयांकडून माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त अर्जांचा निपटारा करण्यात आलेला आहे / येत आहे.
(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यातील दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयातील विविध रिक्त पदे भरणेबाबत

**(१७) ३९४३ (१७-०७-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिव्यांग कल्याण विभागाला स्वतंत्र दर्जा देण्यात आल्यानंतर प्रत्येक जिल्ह्यात दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय स्थापन करण्यात आले असून, त्यासाठी एकूण १,९९९ पदे मंजूर करण्यात येऊनही ती अद्याप भरली गेली नसल्यामुळे संबंधित कार्यालयांचा पदभार अन्य विभागांतील अतिरिक्त कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मंजूर पदे भरून दिव्यांग सक्षमीकरण कार्यालये सक्षमपणे कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१६-१०-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १५/१२/२०२२ अन्वये दिव्यांग व्यक्तींच्या सर्वांगिण विकासाकरीता दिव्यांग कल्याण हा स्वतंत्र मंत्रालयीन प्रशासकीय विभाग निर्माण करण्यात आला आहे.

शासन निर्णय, दिनांक ०४/०१/२०२३ अन्वये मंत्रालय (खुद्द) करीता ४२ पदे तसेच शासन निर्णय, दिनांक १०/१०/२०२४ नुसार मंत्रालय (खुद्द) करीता २५ पदे व विभागाच्या क्षेत्रिय स्तरावर १९९६ पदे मंजूर करण्यात आली आहेत. तत्पूर्वी शासन निर्णय, दिनांक ०४/०२/२००६ अन्वये दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे या कार्यालयाकरीता ९५ पदे व शासन निर्णय, दिनांक ०१/०९/२०१४ अन्वये २ पदे अशी एकूण २०९३ पदे क्षेत्रिय कार्यालयाकरीता मंजूर करण्यात आली आहेत.

विभागाची जिल्हा कार्यालये सुरु करण्याची आवश्यकता विचारात घेवून, राज्यातील १३ जिल्ह्यातील जिल्हा कार्यालये विभागातंर्गत कार्यरत असलेले वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता तसेच अधीक्षक गट-ब यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार देवून दिनांक १ मे, २०२५ पासून सुरु करण्यात आली आहेत. तसेच विभागाच्या दिनांक २५/०८/२०२५ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये उर्वरित जिल्हा कार्यालये संबंधित जिल्ह्यांचे जिल्हा समाजकल्याण अधिकारी / शिक्षणाधिकारी यांचेकडे अतिरिक्त कार्यभार देऊन सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार उर्वरित जिल्हा कार्यालये सुरु करण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये विभागाची जिल्हा कार्यालये नियमितपणे सुरु झाली आहेत.

(२) विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांसाठी नव्याने मंजूर पदांची पदभरती करण्यासाठी, त्या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार होणे आवश्यक आहे. सदर मंजूर पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करून सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

शासन निर्णय, दिनांक २०/०६/२०२५ अन्वये विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशित शासकीय कार्यालयातील गट-क संवर्गातील लिपिक-टंकलेखक पदाचे सेवाप्रवेश नियम लागू करण्यात आले असून, पदभरतीची पुढील कार्यवाही सुरु आहे.

विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील मंजूर पदांच्या सेवाप्रवेश नियमांस मान्यता मिळाल्यानंतर व अन्य प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पदभरतीची कार्यवाही प्राथम्याने करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात वाढत्या गुन्हेगारी कृत्यांमध्ये अंमली तरुणांचा सहभाग वाढत असल्याबाबत

**(१८) ४१५९ (१८-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, उल्हासनगर आणि बदलापूर या तीन शहरांमध्ये मागील काही महिन्यांमध्ये अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या तरुणांचा सहभाग वाढत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमंली पदार्थांचे सेवन केल्यानंतर तरुण कोणताही गुन्हा करण्यासाठी तयार होत असतो तसेच पोलीस प्रशासन अमंली पदार्थ विक्री करण्यांवर कोणतीही कारवाई करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०२५) :** (१), (२) व (३) ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-४, उल्हासनगर मधील पोलीस ठाणे हद्दीत मार्च, २०२५ ते मे, २०२५ मध्ये अंमली पदार्थाचे सेवन करण्यासंदर्भात एकूण ५५ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये ५६ आरोपींना अटक करण्यात आली आहे व सदरच्या ५५ गुन्हयातील आरोपींवर मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर केलेले आहे.

तसेच अंमली पदार्थ ताबा/विक्री करण्यासंदर्भात एकूण ५ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महिलांना हवामान बदलामुळे होणाऱ्या समस्यांकरीता कृती आराखडा तयार करण्याबाबत

**(१९) ४२३२ (१८-०७-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व कोंकण या विभागातील हवामानात सतत बदल होत असल्याने काही तालुक्यात उन्हाळ्यातील तापमान ४० अंश ते ४५ अंशाच्या वर जात असल्याने त्या भागातील महिलांना आरोग्याच्या व आर्थिक समस्या मोठ्या प्रमाणात उद्‌भवत असून त्यांच्या समस्या जाणून घेण्याकरीता शासनाने कृती आराखडा तयार करण्याची मागणी महिला

लोकप्रतिनिधींनीकडुन माहे मे,२०२५ रोजी वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेषत: आदिवासी महिलांना कठीण परिश्रम करून जीवन जगावे लागत असून त्यांना उपजीविकेचे कोणतेच साधन उपलब्ध नसल्याने त्यांना रोजगार हमी योजनेच्या कामावर अवलंबून राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील बदलत्या हवामानाचा महिलांवर व मुलींवर होणारा परिणाम व त्यानुषंगाने उद्भवणाऱ्या समस्या जाणून घेण्यासाठी अभ्यासगट स्थापन करून कृती आराखडा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०२५) :** (१) राज्य वातावरणीय कृती कक्षाकडे वा पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडे महिला लोकप्रतिनिधींकडून अशा प्रकारची कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही.
(२) रोहोयो, नियोजन विभाग यांच्या दिनांक ३०/०९/२०२५ रोजीच्या पत्रानुसार राज्यात आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ४६५०१८ व आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ४३३०२४ आदिवासी कुटुंबातील अनुक्रमे २५८५२८४० व १४११६६७४ मनुष्यदिन रोजगार निर्मिती करण्यात आली आहे. Forest Rights Act २००६ चा लाभ घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांला मगांराग्रारोहयो अंतर्गत १५० दिवस रोजगार उपलब्ध करुन दिला जातो व त्यापुढील दिवसांचा रोजगार उपलब्ध करुन दिल्यास त्याचा खर्च राज्य शासनाव्दारे वहन केल्या जातो असे कळविले आहे.
(३) वातावरणीय बदलाच्या संकटाला तोंड देवून त्याच्या परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने Council for Energy, Environment and Water (CEEW) या संस्थेच्या तांत्रिक सहकार्याने व शासनाच्या इतर विभागांशी विचार विनिमय करून साल २०३० पर्यंतचा महाराष्ट्र राज्याचा सुधारित वातावरणीय कृती आराखडा तयार केला आहे.

राज्य वातावरणीय कृती आराखड्यामध्ये तापमान वाढ, अनियमित पर्जन्यमान, समुद्र पातळीत होणारी वाढ, दुष्काळ, पूर आणि चक्री वादळे या महाराष्ट्र राज्य प्रवण असलेल्या वातावरणीय संकटांच्या बाबतीत जिल्हा व तालुका स्तरावर जोखीम मूल्यांकन करण्यात आले आहे. कृषी, जलसंधारण, वने, सार्वजनिक आरोग्य, पर्यटन, आदिवासी विकास व आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांशी संबंधित अनुकूलन उपाययोजना (Adaptation Strategies) तर ऊर्जा, परिवहन, उद्योग इत्यादि क्षेत्रांशी संबंधित शमन उपाययोजना (Mitigation Strategies) सुचविण्यात आलेल्या आहेत.

वातावरणीय बदलाचा तडाखा स्त्री-पुरुष दोघांनाही बसत असला तरी त्याचा परिणाम मात्र दोघांवर समान नसतो. स्त्रियांचे सामाजिक स्थान, निर्णय प्रक्रियेतील दुय्यम भूमिका, शिक्षण व कौशल्य विकसनाचा अभाव, अपुरे आर्थिक बळ यांमुळे वातावरणीय बदलाचा त्यांच्यावर विपरीत परिणाम होतो. नैसर्गिक आपत्तीमुळे बसणारे गरीबीचे चटके स्त्रियांना, विशेषतः दुर्बल घटकातील स्त्रियांना सर्वात आधी बसतात. त्यामुळे वातावरणीय बदलाला तोंड देण्याच्या कृतींमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढवून स्त्री-पुरुष समानता आणण्याची गरज कृती आराखड्यात अधोरेखित करण्यात आली आहे.

लिंग-संवेदनशीलतेची भूमिका कृतीत आणण्यासाठी राज्य वातावरणीय कृती आराखड्यामध्ये " जाणीव व जागृती व क्षमता वृध्दी ", " स्थावर मिळकतीची मालकी ", " लिंग आधारित अर्थसंकल्प (Gender Budgeting) ", " लिंग आधारित देखरेख आणि मुल्यांकन " व "इतर विभागांसोबत समन्वय " ही पंचसुत्री सांगितली आहे. सदर पंचसूत्रीत नमूद केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी संबंधित विभागांमार्फत करण्यात येणार आहे.

राज्य वातावरणीय बदल कृती आराखड्यात एकात्मक शितकरण योजनेचा समावेश करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त निघालेल्या मिरवणुकीत डीजेच्या आवाजाने एका तरुणाचा मृत्यू झाल्याबाबत

**(२०) ४६४९ (२५-०८-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे ध्वनीप्रदुषण रोखण्यासाठी पोलिसांकडून सर्वत्र प्रयत्न होत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त निघालेल्या मिरवणुकीत डीजेच्या आवाजाने एका तरुणाचा मृत्यू झाला असल्याचे माहे एप्रिल,२०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाचा तपास नाशिक पोलिसांकडून करण्यात आला आहे काय, तसेच त्याचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अहवालातील शिफारशींनुसार डीजेला बंदी घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १३/०४/२०२५ रोजी नाशिक येथे फुलेनगर तिन पुतळा परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त उत्सव सुरु असताना सदर ठिकाणी नितिन फकिरा रणशिंगे हा इसम रोडवर चक्कर येवुन पडल्याने त्यास बेशुध्द अवस्थेत औषधोपचारा कामी सिव्हिल हॉस्पिटल, नाशिक येथे दाखल केले असता त्यास वैदयकिय अधिकारी यांनी तपासून मयत घोषित केले आहे.

सदर मयताचे दिनांक १४/०४/२०२५ रोजी शवविच्छेदन केले असता शवविच्छेदन अहवालात (CORONARY ARTERY DISEASE WITH BILATERAL PNEUMONITIS) निमोनिया व हार्टअॅटकने मृत्यू झाल्याचे नमुद करण्यात आले आहे. त्याबाबत ॲडव्हान्स सर्टिफिकेट प्राप्त झालेले आहे.

सदर प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद क्रमांक ८८/२०२५, भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १९४ (१) प्रमाणे करण्यात आली आहे. तसेच मयतास साधारण चार वर्षापासून टी.बी. हा आजार असल्याचे व त्याबाबत देखील त्याच्यावर उपचार सुरु असल्याचे तपासातुन दिसुन आले आहे.

(२) सदर प्रकरणाचा उपरोक्त प्रमाणे नाशिक पोलीसांकडुन तपास करण्यात आला आहे. परंतु वरिल प्रमाणे अकस्मात मृत्यूची घटना असल्याने पोलीस घटकाकडुन त्याचा अहवाल शासनास सादर करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.